| | | | |
|---|---|---|---|
| **MHST090000872019** | दाखल दिनांक | : | ०३-०१-२०१८ |
| | नोंदणी दिनांक | : | ०३-०१-२०१८ |
| | निकाल दिनांक | : | ०४-०७-२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि. |
| | | | ०८ ०६ ०१ |
| CNR. No.MHST090000872019 | | | |

नियमित फौजदारी खटला क्रमांक – ३९/२०१९ निशाणी क्रमांक –

(न्यायनिर्णय)

**भाग – अ**

| |
|---|
| कोरेगांव येथील न्यादंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रमांक १, ता. कोरेगांव, जि. सातारा.<br>( पिठासण अधिकारी – चंद्रशिला एस. पाटील)<br>(०४/०७/२०२६)<br>(नियमित फौजदारी खटला क्रमांक ३९/२०१९) |
| (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१), ५३(७),४३ ) |

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>कोरेगांव पोलीस स्टेशन, ता. कोरेगांव जि. सातारा. |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता** | | **श्री. व्ही. एस. कोकाटे** |
| **आरोपी** | | **१. हरुण शौकत झारी (मयत)**<br>**२. सत्तार शौकत झारी**<br>वय – ५५ वर्षे, धंदा – वेल्डींग<br>रा. साखळी पुलाजवळ, कारेगांव, सातारा– |

| | | |
|---|---|---|
| | | पुसेगांव जाणा–या मेन रोडच्या बाजूला ता. कोरेगांव, जि. सातारा. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | **श्री. एस. जी. मुलाणी** |

**भाग - ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | मार्च २०१८ ते दिनांक २९/११/२०१८ चे दरम्यान |
| तक्रार दाखल दिनांक | | २९/११/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | | ०८/०३/२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | | ०५/११/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंर्दभात आदेशाचा दिनांक | | **निरंक** |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्रमांक | नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **२.** | **सत्तार** | फौजदारी | | **महाराष्ट्र** | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **शौकत झारी** | प्रक्रिया संहिता कलम ४१- अ अन्वये नोटीस दिली. | | **प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१), ५३(७)** | मुक्तता करण्यात आली. | | |

**भाग - क**

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार /बचावपक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | संतोष बबन भस्मे | फिर्यादी | १४ |
| २. | शेखर बाळासाो बर्गे | पंच | २२ |
| ३. | तुकाराम बंडू जाधव | पंच | ३० |

**ब. बचाव पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**मुद्देमालाचे वर्णन –**

| क्रमांक | मुद्देमाल क्रमांक /आर्टीकल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०४/०७/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१), ५३(७) खालील अपराधाकरीता चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२] फिर्यादी संतोष बबन भस्मे रा शाहुनगर सुलतानवाडी रोड कोरेगाव ता. कोरेगाव जि. सातारा येथे त्यांच्या कुटुंबीयासह एकत्रात राहणेस आहेत. फिर्यादी कोरेगांव नगर पंचायतीमध्ये बांधकाम व अतिक्रमण विभाग प्रमुख म्हणुन काम करीत आहेत. कोरेगाव नगर पंचायत हद्दीमध्ये होत असलेली अनाधिकृत वापर इत्यादी बाबतचा शोध घेणे व त्यासंबंधी कार्यवाही करणे इत्यादी कामे त्यांचे कार्यक्षेत्रात येतात. दिनांक २४/०४/२०१८ रोजी फिर्यादीने सिटी सर्व्हे नं १८३० या मिळकतीची पाहणी केली असता त्या ठिकाणी श्री हरुण शौकत झारी व सत्तार शौकत झारी रा. साखळी पुलानजीक कोरेगाव ता कोरेगाव जि सातारा यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदी नुसार आवश्यक असलेली परवागी नगरपंचायत कोरेगाव यांचेकडुन न घेता त्यांनी श्री तुकाराम बंडु जाधव रा

साखळी पुलानजीक कोरेगाव यांचे मालकीचे सिटी सर्व्हे नं. १८३० या मिळकतीमध्ये श्री हरुण शौकत झारी व सत्तार शौकत झारी यांनी अतिक्रमण व विनापरवाना अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. सदर श्री हरुण शौकत झारी व सत्तार शौकत झारी यांनी केलेल्या जागेवरील बांधकाम हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे तरतुंदीचे उल्लंघन करणारे असल्याने त्यांना नगरपंचायतीकडुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये मुख्यधिकारी नगरपंचायत कोरेगाव यांचे सही शिक्क्यानिशीचे नोटीस दिनांक २४/०४/२०१८ रोजी देवुन जागेवरील बांधकाम पाडुन टाकणेबाबत तसेच जागेवर केलेला वापर थांबविणेबाबत कळविले होते. दिनांक २३/१०/२०१८ रोजी पुन्हा बांधकामाची पाहणी केली असता त्यांना दिलेल्या नोटीसाप्रमाणे त्यांनी पुर्तता केली नसल्याचे दिसुन आले म्हणुन फिर्यादीने परत त्यांना नोटीस द्वारे चोवीस तासाचे आत केलेले बांधकाम काढुन टाकावे व तसे केलेबद्दल सदर नोटीस मिळालेपासुन चोवीस तासाचे आत कळवावे. मात्र यापैकी एकही पुर्तता यांनी केलेली नाही. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली.

३] सदर तक्रारीवरून आरोपींविरूद्ध गुन्हा क्रमांक ३३५/२०१८ अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी श्री. डी. बी. चुडाप्पा यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे टिपण घेतले. गुन्हयाचा तपास पुर्ण करून आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

४] माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१), ५३(७) अन्वये दोषारोप (नि. ११ ) निश्चित केला. आरोपींनी गुन्हा मान्य व कबुल नसल्याचे सांगुन खटला चालविणेची मागणी केली.

५] आरोपींवर गुन्हादर्शक परिस्थिती उपलब्ध झाल्याने आरोपींचे फौ. प्र. सं. कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र. ३७ वर नोंदविले आहेत. साक्षीदार क्र. १ व २ हे साक्षीदार

क्र. ३ च्या हितासाठी व त्यांचे दबावामुळे स्वार्थापोटी द्वेषभावनेने खोटी साक्ष देत आहेत असे निवेदन आरोपीतर्फे देण्यात आले.

६] अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एस. कोकाटे यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. जी. मुलाणी यांचा युक्तिवाद ऐकला. न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विवेचनास उत्पन्न होतात, त्याचा निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, मौजे कोरेगांव ता. कोरेगांव, जि. सातारा गावचे हद्दीत सातारा ते पुसेगांव जाणा–या रोडच्या दक्षिणेस तुकाराम बंडू जाधव यांची कोरेगांव नगरपंचायत हद्दीतील मिळकत सिटी सर्व्हे नंबर १८३० मधील जागेमध्ये मार्च २०१८ ते दिनांक २९/११/२०१८ पर्यंतच्या दरम्यान आरोपी क्र. १ व २ यांनी त्या जागेमध्ये नगर पंचायत कोरेगांव यांचा कोणत्याही प्रकारचा बांधकाम परवाना अथवा इतर कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता दोन मजली लोड बेअरिंगची नवनी बेकायदेशीर इमारत बांधली व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१), ५३(७) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## ***<u>का र ण मि मां सा</u>***

**<u>मुद्दा नं.१ करीता</u>–**

७] आरोपींविरूद्ध गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने प्रामुख्याने हे शाबीत

करणे गरजेचे आहे की, मौजे कोरेगांव ता. कोरेगांव, जि. सातारा गावचे हद्दीत सातारा ते पुसेगांव जाणा–या रोडच्या दक्षिणेस तुकाराम बंडू जाधव यांची कोरेगांव नगरपंचायत हद्दीतील मिळकत सिटी सर्व्हे नंबर १८३० मधील जागेमध्ये मार्च २०१८ ते दिनांक २९/११/२०१८ पर्यंतच्या दरम्यान आरोपी क्र. १ व २ यांनी त्या जागेमध्ये नगर पंचायत कोरेगांव यांचा कोणत्याही प्रकारचा बांधकाम परवाना अथवा इतर कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता दोन मजली लोड बेअरिंगची नवनी बेकायदेशीर इमारत बांधली.

८] आरोपींविरुद्धचा गुन्हा शाबीत करणेकरिता अभियोगपक्षाच्या वतीने एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले आहेत. साक्षीदार क्र. १ संतोष लिपीक कोरेगांव नगर पंचायत यांनी ते सन २०१८ पासून कोरेगांव नगर पंचायत मध्ये अतिक्रमण विभागामध्ये विभागप्रमुख म्हणून काम करतात. बांधकाम परवानगी देणे, अतिक्रमण केले असल्यास नोटीस देवून ते काढून घेणे असे त्यांचे कामाचे स्वरुप असून दिनांक २४/०४/२०१८ रोजी जाधव यांनी तक्रारी अर्ज दिला होता. त्यानुसार त्यांनी आरोपीस निशाणी क्र. १५ अन्वये नोटीस दिली परंतू आरोपींनी नोटीसची पूर्तता न केल्याने त्यांना पुन्हा नोटीस पाठविली. दिनांक २३/१०/२०१८ रोजीची नोटीस निशाणी १६ वर आहे. आरोपींनी पूर्तता न केल्याने त्यांनी निरीक्षण अहवाल दिला होता त्यामुळे देखील आरोपींनी अतिक्रमण काढून घेतले नाही म्हणून त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये निशाणी १८ प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान सि. स. क्र. १८३० ची मोजमापे व हद्दी साक्षीदारास माहिती आहेत. सि. स. १८३० मध्ये नावाचा फलक नव्हता. तुकाराम जाधव म्हणजेच फिर्यादीने दिलेल्या माहीतीवरुन सि. स. १८३० हा निश्चित केला. दिनांक २४/०४/२०१८ रोजी तुकाराम जाधव यांच्या मुलांना बोलाविले. त्या दिवशी घराला रंग देण्याचे काम पूर्ण झाले होते किंवा कसे याबाबत त्यांना सांगता येणार नसून यापूर्वी दाखल केलेल्या दाव्यांची माहिती साक्षीदारास नाही. तसेच नोटीस कामी कोणतीही पाहणी न केल्याने इतर कथने नाकारली आहेत.

९] साक्षीदार क्र. २ शेखर यांनी त्यांच्या सरतपासात साक्षीदार क्र. १ च्या पुराव्यास पुष्टी देवून दिनांक २९/११/२०१८ रोजी पंचनामा करिता गेलेबाबत कथन केले आहे. तसेच पंचनाम्याचे स्थान स्पष्ट करुन मुख्य रस्त्याला लागून झारी यांची मिळकत आहे. झारी यांची

मिळकत रस्त्यालगत पूर्वमुखी होती. त्यांचे घरालगत फिर्यादीचे घर आहे. दोन्हींच्या मध्ये भिंत असून अतिक्रमण केल्याचे दिसून आल्याचे भस्मे यांनी त्यांना सांगितले व सदर अतिक्रमण झारी यांनी केल्याचे सांगितले. तिथे पक्के बांधकाम करुन त्यास रंगकाम केल्याचे दिसून आले त्याप्रमाणे त्यांचेसमक्ष पंचनामा केला होता. उलटतपासादरम्यान झारी यांची मिळकत सातारा – पंढरपूर रस्त्याला असून आरोपींचे कुटुंब वाडवडीलांपासून घटनास्थळावरच्या जागेवर राहतात ही बाब मान्य केली. तसेच आरोपी वेल्डींगचा व्यवसाय करीत असून पोलीसांनी पंचनामा लिहून ठेवला होता याबाबत कबुली दिली. आरोपी व फिर्यादी यांच्या हद्दी कोठून सुरू होतात व कोठे संपतात हे कागदपत्रांशिवाय सांगू शकत नसल्याचे कथन केले आहे. पुढे साक्षीदाराने हे मान्य केले की, आरोपी व फिर्यादी यांच्या मिळकत एकमेकास लागून असून सामाईक भिंत आहे. तसेच पुढे हे कथन मान्य केले की, कोणतीही वैयक्तिक शहानिशा न करता भस्मेंच्या सांगणेवरुन त्यांनी सह्या केल्या होत्या.

१०] साक्षीदार क्र. १ फिर्यादी, यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कोरेगांव मधील पाच मिळकती त्यांच्या नावे असून ७/१२ उतारा असल्याचे त्यांनी कथन केले. फिर्यादीने त्यांचे खात्यावर मिळकत क्र. १८२४, उत्तर बाजूस १८३० मधील मोकळी जागा आहे व घराच्या पश्चिमेला आरोपीचे घर असल्याचे तसेच आरोपी क्र. १ याने २०१८ मध्ये त्यांचे जागेत अतिक्रमण करुन बांधकाम केले होते त्याबाबत अर्ज दाखल केले आहेत. उलटतपासादरम्यान मिळकतीच्या पश्चिमेला सि. स. क्र. १८२६ व १८२९ ही झारी यांच्या मालकीची आहेत. सदर मिळकत सन १९६७ मध्ये आरोपींच्या पूर्वहक्कदाराने खरेदी केल्याची साक्षीदारास माहिती नाही. साक्षीदाराने आरोपींविरुद्ध अतिक्रमण काढूण घेणेचा दावा कधीही केलेला नाही. साक्षीदाराने पुढे सांगितले की, अतिक्रमण नव्हते त्यामुळे तसा दावा केला नाही. अर्ज देण्यापूर्वी मिळकत सि. स. नंबर १८३० ची मोजणी करुन घेतली होती परंतू अर्जासोबत तसा नकाशा जोडला नाही. आरोपी झारी यांचे कुटुंब मिळकतीच्या खरेदीपासून त्यांच्या पश्चिमेस राहत असून आरोपींच्या बाजूला त्यांच्या घराच्या पश्चिम बाजूला खिडकी तसेच दरवाजा नाही. मिळकत सातारा – पंढरपूर रस्त्याला असून उत्तर बाजूला रस्ता येतो. त्याच्या घराची लांबी – रुंदी त्यांना सांगता येणार नाही. तसेच अतिक्रमणाबाबत कोणताही पुरावा त्यांनी पोलीसांना दिला नव्हता व इतर कथने नाकारली.

११] सदर प्रकरण हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ प्रमाणे दाखल असल्याने सदर प्रकरणात नगररचना अथवा नगरपंचायत तर्फे संबंधित इसमाची साक्ष काळजीपूर्वक पाहणे महत्वाचे वाटते त्याप्रमाणे साक्षीदार क्र. १ संतोष भोसले याचा पुरावा पाहिला असता त्यांनी नगरपंचायतीमध्ये लिपीक म्हणून कार्यरत असून बांधकाम परवानगी देणे अथवा अतिक्रमणाची कारवाई करणेची असल्यास नोटीसा देणे व बांधकाम काढून घेणे असे असून दिनांक २४/०४/२०१८ रोजी फिर्यादीचा अर्ज प्राप्त झाला त्यानुसार त्यांनी आरोपीला नोटीस दिली. ती निशाणी १५ वर असून आरोपीने कोणतीही पूर्तता न केल्याने त्यास पुन्हा निशाणी १६ वरील नोटीस पाठविली तरी देखील आरोपीने अतिक्रमण काढले नसल्याने फिर्याद दाखल केली. उलटतपासादरम्यान साक्षीदार स्वतः सप्टेंबर १६ पासून बांधकाम विभागात विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे. सि. स. १८३० बद्दल जी माहिती फिर्यादीने दिली त्यानुसार नोटीस पाठविली. परंतू सि. स. नंबर १८३० च्या चतुःसीमा त्यास सांगता येणार नाहीत. तसेच सदर महत्वाची बाब म्हणजे ज्या साक्षीदाराने फिर्याद दाखल केली आहे त्या साक्षीदाराने सि.स. क्र १८३० ची मोजमापे व हद्दी त्यास माहिती नसून सि. स. च्या अधिका–यांना घेवून सि. स. क्र. १८३० मध्ये कधीही गेलो नाही असा खुलासा केलेला आहे व पुढे फिर्यादीने दिलेल्या माहितीप्रमाणे सि. स. क्र. १८३० निश्चित केला असे कथन केले आहे. यावरुन ही बाब स्पष्ट होते की, सदर साक्षीदार हा संबंधित कार्यालयातील असून तक्रार आल्यानंतर आरोपींनी खरोखरच महाराष्ट्र प्रादेशिक व अधिनियम १९६६ चे कलम ५२–१, कलम ५३–७ अन्वये अभिलेख दाखल करावयाचा असेल तर घटनास्थळाची पाहणी करुन तशी मोजमापे घेवून फिर्याद दाखल करणे व तपासी अधिकारी यांनी तशी सर्व मोजमापे घेवून पुराव्यानिशी दोषारोपपत्र दाखल करुन घेणे कायदेशीर कारवाई करणे उचित आहे परंतू तशी कोणतीही कार्यवाही अधिका–यांनी केली नसल्याचे दिसून येते. निशाणी १५ व १६ वरील आरोपीस दिलेली नोटीस पाहता त्यामध्ये अनाधिकृत बांधकाम केले व ते काढून घ्या अशा प्रकारचा मजकूर नमूद केल्याचे दिसून येते परंतू अनाधिकृत बांधकाम केल्याचा कोणताही पुरावा मोजमापासह सादर केल्याचे दिसून येत नाही. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे सदर प्रकरण हे सन २०१८ मध्ये दाखल केले असून प्रकरणातील दाखल अधिकारी डी. बी. चुडाप्पा यांना न्यायालयाने वारंवार साक्षीसमन्स पाठविले असता सदर साक्षीदार साक्षीकामी न्यायालयात हजर राहिले नाहीत त्यामुळे न्यायालयाने निशाणी क्र. १ वर दिनांक ०७/०४/२०२६ रोजी निशाणी क्र. ३५ वरील आरोपीने दाखल केलेल्या

अभियोगपक्षाचा पुरावा बंद करावा या अर्जावरुन अभियोगपक्षास संबंधित केस लवकर संपविण्याच्या दृष्टीने उचित कारवाई करणेचा आदेश करुन त्यानंतर देखील उचित संधी देवून बंद केलेला आहे.

**१२]** साक्षीदार क्र. २ यांनी उलटतपासादरम्यान पोलीसांनी पंचनामा लिहून ठेवला होता. तसेच जाधव व झारी यांच्या मिळकती कोठून सुरू होतात व कोठे संपतात हे कागदपत्रानिशी ते सांगू शकत नाहीत. आरोपी व फिर्यादीची मिळकत एकमेका लगत आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्या मध्ये सामाईक भिंत असून रंगकाम केलेली मिळकत वैयक्तिक कोणाची होती याबाबत त्यांनी स्वतः शहानिशा केलेली नाही. साक्षीदार क्र. १ व ते एकाच कार्यालयात असल्याने त्यांना फोन आला व त्यांना पंचनाम्यास सही करणेस सांगितले व ते तेथे गेले. साक्षीदार क्र. १ ने त्यांचे समक्ष कागद ठेवला व त्यावर सही केली. सदर साक्षीदाराने पुढे मान्य व कबूल केले की, कोणतीही वैयक्तिक शहानिशा न करता साक्षीदार क्र. १ च्या सांगणेप्रमाणे त्यांनी सह्या केल्या होत्या. सदर साक्षीदाचा एकंदरीत पुरावा पाहिला असता सदर साक्षीदाराने साक्षीदार क्र. १ भस्मे यांनी केलेल्या तयार पंचनाम्यावर सह्या केल्या ही बाब मान्य व कबूल केल्याने सदर साक्षीदाराचा पुरावा हा पुर्णपणे अवलंबून राहण्याजोगा नसून अभियोगपक्षाचा इतर पुरावा पाहणे गरजेचे आहे.

**१३]** साक्षीदार क्र. १ श्री. भस्मे यांनी पुढे उलटतपासामध्ये असे कथन केले की, दिनांक २४/०४/२०१८ रोजी बांधकामाचे स्वरुप काय होते हे त्यांना सांगता येणार नाही. तसेच पुढे १८३० या मिळकतीमध्ये गेलो नाही या कथनाला नकारार्थी उत्तर देवून तुकाराम जाधव यांनी दाखविलेली मिळकत व सि. स. वरील नमूद मिळकतीमध्ये गेलो होतो असा पुरावा दिल्याचे दिसून येते. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये सि. स. च्या अधिका–यांसह सि. स. क्र. १८३० मध्ये गेलो नाही. त्याची मोजमापे व हद्दी त्यास माहिती नाहीत. चतुःसीमा सांगता येणार नाहीत असा पुरावा देवून पुढील उलटतपासामध्ये सि. स. क्र. १८३० च्या मिळकतीत गेले असल्याचे कथन केले आहे. साक्षीदाराने १८३० च्या मिळकतीत गेलो असे उर्वरीत उलटतपासात कथन केले असले तरी तरतुदींचा भंग करुन बांधकाम केल्याबाबत तसा उतारा अथवा कोणतीही कागदपत्रे प्रकरणात दाखल केलेली नाहीत. तसेच अतिक्रमण केलेले बांधकाम

नेमके किती होते याबाबतचा कोणताही खुलासा नोटीस निशाणी १५ व १६ मध्ये केल्याचे दिसून येते. त्यामुळे तसेच सर्वात महत्वाची बाब म्हणजे अभियोगपक्षाने तपासी अधिका–यांना वारंवार समन्स काढून देखील तपासी अधिकारी यांनी प्रकरणात हजर राहून अथवा दृकश्राव्य माध्यमांच्या आधारे त्यांचा पुरावा नोंदविला नसल्याने उपलब्ध पुराव्यावरुन कोणताही निष्कर्ष काढणे उचित होणार नाही.

**१४]** एकंदरीत साक्षीदार क्र. १ भस्मे यांचा पुरावा साक्षीदार क्र. २ पंच साक्षीदार व फिर्यादी यांचा पुरावा पाहिला असता अभियोगपक्षाचे संपूर्ण प्रकरण हे फक्त फिर्यादीच्या पुराव्यावर अवलंबून असून सदर प्रकरण हे महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ प्रमाणे दाखल असल्याने सदर प्रकरणात नगररचना विभागाचा तरतुदींचे उल्लंघन करुन आरोपीने बांधकाम केले होते हे दाखविणारा सबळ पुरावा प्रकरणामध्ये दाखल असणे आवश्यक होते परंतू साक्षीदार क्र. १ भस्मे यांचा पुरावा हा संपूर्णतः विश्वासाहार्य वाटत नाही व साक्षीदार क्र. ३ च्या पुराव्यास साक्षीदार क्र. १ व २ यांच्या पुराव्यातून संपूर्णपणे पुष्टी मिळत नाही तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा सदर पुराव्यास पुष्टी देणेकरीता उपलब्ध नाही त्यामुळे आरोपींविरुद्धचा गुन्हा अभियोगपक्षाने संशयाच्या पलीकडे जावून शाबीत केला असे म्हणणे उचित होणार नाही. परिणामी मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा नं. २ करीता</u>–**

**१५]** सदरचे प्रकरण सन २०१९ मध्ये दाखल करणेत आले असून सन २०२२ मध्ये दोषारोपपत्र दाखल करणेत आले व दिनांक ०५/११/२०२२ मध्ये साक्षीदार क्र. १याचा पुरावा नोंदविला व त्यानंतर तब्बल दोन वर्षे साक्षीदार क्र. २ याचा पुरावा व साक्षीदार क्र. ३ याचा पुरावा सन २०२५ मध्ये नोंदविण्यात आला असून जवळपास पाच वर्षे अभियोगपक्षाचा पुरावा चालू असून तपासी अधिकारी यांचा पुरावा अभियोगपक्षाने नोंदविल्याचे दिसून येत नाही. तपासी अधिकारी दादासाो चुडाप्पा यांना वारंवार समन्स पाठवून देखील त्यांचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध झाला नाही ही बाब अतिशय गंभीर आहे.

सदर प्रकरणाच्या पुराव्यादरम्यान आरोपी क्र. १ हा मयत झाल्याने त्याचे विरुद्ध खटला

अवसान केल्याबाबतचा आदेश दिनांक १३/०१/२०२६ रोजी करणेत आला असून सदरचे प्रकरण आरोपी क्र. २ सत्तार झारी याचेकरीता चालविण्यात आले होते तरी वर नमूद संपूर्ण चर्चेवरुन आरोपींविरुद्धचा गुन्हा शाबीत न झाल्याने आरोपी सदर गुन्हयातून निर्दोष सुटण्यास प्रात्र आहे करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १ | **आरोपी क्र. २ सत्तार शौकत झारी** यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(१), ५३(७) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचा जामीन कतबा व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३ | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रु.१५,०००/- चा लायक जामीनदाराचा जामीन कतबा व जातमुचलका देणेचा आहे. |

*(खुल्या न्यायालयात घोषीत केला.)*

कोरेगांव. **(चंद्रशिला एस. पाटील)**

दि. ०४/०७/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील न्यायनिर्णय हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखक – श्री. एन. डी. खुस्पे

न्यायालय – प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव

न्यायनिर्णय संक्रमित दिनांक –०४/०७/२०२६

लघुलेखक